दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर | वर्ष ५ वे | अंक ४९ | शनिवार दि.२३ ऑगस्ट २०२५ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.


## विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने यशस्वी होण्यासाठी आकाश एज्युकेशनल सर्विसेस एकमेव पर्याय.

### उद्याच्या समस्यांचे समाधान करणाऱ्या विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी अँथे २०२५ ची घोषणा

लातूर:- मागील १६ वर्षांपासून सर्विसेसचा पर्याय विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना यशात रुपांतरित करत आलेल्या 'आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड' (एईएसएल) देशातील अग्रगण्य टेस्ट प्रिपरेटरी संस्थेने आपल्या प्रतिष्ठित उपक्रमाची 'अँथे २०२५' (आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम) घोषणा केली आहे. भारतीय शैक्षणिक क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वाची ही परीक्षा असून, इयत्ता पाचवी (५)ते (१२) बारावीच्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम करणे हा या परीक्षेचा मुख्य उद्देश असल्याचे 'आकाश'चे शालिक मापारी ब्रांच हेड यांनी सांगितले. 'अँथे २०२५'च्या लॉचिंगप्रसंगी ते शुक्रवार (दि.२२) रोजी लातूर येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. यावेळी स्थानिक आकाश संस्थेतील क्षितिज जैन अकॅडमी हेड मेडिकल, संजय कौळ अकॅडमिक हेड फाउंडेशन, दिग्विजय कांबळे असिस्टंट मॅनेजर लातूर येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्री. मापारी म्हणाले की, 'अँथे' ही परीक्षा आज संपूर्ण भारतभरातील विद्यार्थ्यांसाठी संधीचे प्रतीक बनली आहे. मागील १६ वर्षांपासून आम्ही हुशार आणि




गुणी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करता यावा यासाठी मदत करत आलो आहोत. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांची आर्थिक पार्श्वभूमी किंवा स्थान कुठलेही असो, 'आकाश'मध्ये अशा विद्यार्थ्यांची क्षमता शोधून त्यांना शिक्षणासाठी चालना दिली जाते. या वर्षापासून आकाश इन्व्हिक्टसएस टेस्ट देखील सुरु करणार असून, जो शिष्यवृत्ती आणि इन्व्हिक्ट्स प्रवेशासाठी घेतला जाईल. हा कोर्स जेईई ॲडव्हान्सच्या तयारीसाठी खास डिझाईन केल्याचेही श्री. मापारी यांनी स्पष्ट केले.

**अशी असेल परीक्षा**

'अँथे २०२५' ही परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून घेतली जाईल. जेणेकरून देशभरातील विद्यार्थ्यांना सोयीस्कर पर्याय मिळेल. 'अँथे' ची ऑनलाइन परीक्षा ४ ते १२ ऑक्टोबर दरम्यान होईल. विशेष म्हणजे विद्यार्थी त्यांना सोयीच्या वेळेत एक तासाचं स्लॉट निवडून ही परीक्षा देऊ शकतील. ऑफलाइन परीक्षा ५ आणि १२ ऑक्टोबर रोजी भारतातील २६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ४१५ पेक्षा जास्त आकाश सेंटर्सवर होणार आहे.

**कशी कराल नोंदणी**

'अंथे' साठी नोंदणी सुरु झाली आहे. विद्यार्थ्यांनी https://anthe.aakash.ac.in/होश या वेबसाईटवर जाऊन ऑनलाइन नोंदणी करु शकतात किंवा जवळच्या आकाश सेंटरला भेट देऊ शकतात. परीक्षा शुल्क ऑनलाइन आणि आफलाईन दोन्हीसाठी ३०० रुपये आहे. लवकर अर्ज करणाऱ्यांना ५० टक्के सूट मिळेल. ऑनलाइन परीक्षेसाठी निवडलेल्या तारखेच्या तीन दिवस आधी आणि ऑफलाइन परीक्षेसाठी सात दिवस आधी अर्ज करणे आवश्यक आहे. प्रवेशपत्र परीक्षा तारखेच्या पाच दिवस अगोदर मिळेल, असेही मापारी यांनी सांगितले आहे.,

## बीडमध्ये सरकारी वकिलाच्या आत्महत्ये प्रकरणी न्यायाधीश, लिपिकावर गुन्हा दाखल

बीड : येथील सरकारी वकील विनायक लिंबाजी चंदेल (४७, रा. इंदेवाडी, जि. परभणी) यांनी २० ऑगस्ट रोजी वडवणी न्यायालयातच गळफास घेऊन आत्महत्या केली होती. याप्रकरणात दोन दिवसानंतर गुन्हा दाखल झाला आहे. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत त्यांनी एका न्यायाधीशावर आणि लिपिकावर मनमानी कारभार, वारंवार अपमान करून मानसिक छळाचा आरोप केल्याने हे प्रकरण अधिक गंभीर बनले आहे.




विनायक चंदेल यांचा मुलगा विश्वजित चंदेल (१९) यांनी वडवणी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे वडील जानेवारी २०२५ मध्ये एमपीएससी परीक्षेद्वारे सरकारी वकील म्हणून वडवणी न्यायालयात रूजू झाले होते. जून २०२५ पासून वडवणी कोर्टातील नवनियुक्त न्यायाधीश रफीक शेख आणि लिपिक आण्णासाहेब तायडे हे त्यांना विनाकारण मानसिक त्रास देत होते. कामामध्ये अपमानित करणे, मनमानी काम करणे आणि त्यांचे म्हणणे न ऐकल्यामुळे ते सतत चिंताग्रस्त राहत होते. त्यातूनच त्यांनी आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलल्याचे विश्वजित याने म्हटले आहे.

दोन दिवसानंतर गुन्हा दाखल २० ऑगस्ट रोजी सकाळी चंदेल यांनी आत्महत्या केल्यानंतर त्यांच्या खिशात चिठ्ठी सापडल्याची जोरदार चर्चा सुरू होती. परंतू त्यात न्यायाधिशांचे नाव असल्याने वडवणी पोलिसांकडून ही माहिती दडविण्यात आली होती. शिवाय विनायक यांचा मुलगा विश्वजीत यानेही पोलिसांवर गुरूवारी आरोप केला होता. या प्रकरणावर माध्यमांनी प्रकाश टाकल्यावर शुक्रवारी दुपारी ३:४७ वाजता गुन्हा दाखल झाला. नातेवाईकच तक्रार द्यायला येत नव्हता, असा खुलासा पोलिसांनी केला असला तरी विश्वजीत यांच्या आरोपामुळे त्यात किती तथ्य? याबाबत संशय व्यक्त होत आहे.

## संकल्प मेळाव्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे आवाहन

## संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून पप्पू कागदे काय संदेश देणार !

> संकल्प काय ! :- या संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून काही दिवसात येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पप्पू कागदे हे कार्यकर्त्यांना काय संदेश देणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> बॅनर्स, झेंडे आणि पताका लागल्याने मेळाव्याची चर्चा :- केज शहरात आणि शहरात येणाऱ्या रस्त्यांवर शहराच्या बाहेर देखील दीड ते दोन किमी अंतरावर मेळाव्याचे बॅनर्स, झेंडे आणि पताका लावल्याने सर्वत्र मेळाव्याची चर्चा आहे. तर दीपक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गावागावात बैठका सुरू आहेत.

केज/प्रतिनिधी बहुजन समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांना सामाजिक शैक्षणिक व सामाजिक स्तरावर खऱ्या अर्थाने हक्क मिळवून देण्यासाठी गायरान धारकांचे प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी व विविध प्रश्नांची शासन दरबारी सोडवणूक करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री ना. रामदास आठवले यांच्या आदेशा वरून युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत केज तालुका रिपाइंच्या वतीने दि. २५ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी दुपारी ठीक १२:३० वाजता मुक्ताई फंक्शन हॉल भवानी चौक केज येथे संकल्प मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास राजू जोगदंड, मझरखान प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. याच मेळाव्याच्या माध्यमातून येऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत काय संदेश देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष पूर्ण झाले असताना सुद्धा उपेक्षित घटकातील समाज बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी संघर्ष करावा लागत आहे. उपेक्षित घटकातील समाज बांधवांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी केज तालुका रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत केज शहरातील मुक्ताई फंक्शन हॉल भवानी चौक केज येथे रिपाइंचा भव्य संकल्प मेळावा २५ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. तरी या मेळाव्यास रिपाइं पदाधिकारी, युवा आघाडी पदाधिकारी, गायरानधारक, घरकुलधारक, कार्यकर्ते यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन संकल्प मेळाव्याचे आयोजक तथा केज रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे, गोवर्धन वाघमारे, उत्तम आप्पा मस्के, राहुल सरवदे, रवींद्र जोगदंड ,दिलीप बनसोडे, ईश्वर सोनवणे, विकास मस्के, कपिल कागदे, रमेश निशिगंध, गौतम बचुटे, निलेश ढोबळे, राजेश सोनवणे, सुरज काळे, बाळासाहेब ओव्हाळ, प्रशांत हजारे, अनिता वाघमारे, सुरेखा गायकवाड, सरस्वती शिनगारे, विकास आरकडे, भारत गायकवाड, मिलिंद भालेराव, कैलास जावळे, हरीश गायकवाड, दादाराव धेंडे, अंबादास तुपारे, रुपचंद ढालमारे, इब्राहिम इनामदार, शेख मौला, जयपाल रोकडे, प्रदिप शिनगारे, नितीन घोडके, हरेंद्र धीरे, डॉ.चत्रभुज हिरवे, मसु बचुटे, विनोद गायकवाड, रवींद्र तुपारे, संभाजी हजारे, विनोद शिंदे, रोहित बचुटे, राहुल बचुटे, आदींनी केले आहे.

## मी घाबरणार नाही, मी थकणार नाही ! दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांची गर्जना

दिल्लीचा वाहतूक विभाग मार्ग चार्ट तयार करत आहे. त्याची सुरुवात यमुना ओलांडून केली जाईल. यमुना स्वच्छ केली जाईल. तुमचे मुख्यमंत्री घाबरणार नाहीत, थकणार नाहीत किंवा पराभूत होणार नाहीत. मी विकासासाठी तुमच्यासोबत संघर्ष करत राहीन, असे प्रतिपादन दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी केले. शुक्रवारी गांधी नगर मार्केटमधील एका कार्यक्रमाला गुप्ता उपस्थित राहिल्या. २० ऑगस्ट रोजी झालेल्या हल्ल्यानंतर गुप्ता यांचा हा पहिलाच कार्यक्रम होता. त्या म्हणाल्या की दिल्ली १० ते १२ वर्षांत खूप मागे गेली आहे. पण आम्ही दिल्लीच्या विकासासाठी एकत्र आलो आहोत. मी यमुना पारच्या लोकांना दोन भेटवस्तू देत आहे. पहिले, आमदार अरविंद सिंग लवली यांना यमुना विकास मंडळाचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. दुसरे, यमुना पारच्या विकासासाठी जे काही बजेट उपलब्ध आहे ते देण्यात आले आहे. यावेळी कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमस्थळाभोवतीची सर्व दुकाने बंद करण्यात आली होती आणि प्रत्येक कोपऱ्यावर निमलष्करी दल आणि दिल्ली पोलिस तैनात करण्यात आले होते.



बुधवारी राष्ट्रीय राजधानीतील मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी आयोजित जनसुनावणी कार्यक्रमादरम्यान राजकोटचे रहिवासी राजेश खिमजी यांनी गुप्ता यांच्यावर हल्ला केला होता. पोलिसांनी त्यांना तात्काळ ताब्यात घेतले आणि पाच दिवसांच्या पोलिस कोठडीत पाठवले.

## महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांचा मार्ग मोकळा; 'या' दिवशी प्रभाग रचना लवकरच जाहीर होणार

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी आता वेग घेऊ लागली आहे. दिवाळीनंतर निवडणुका जाहीर होण्याची शक्यता असून, राज्य निवडणूक आयोगाने या दृष्टीने कार्यवाही सुरू केली आहे. मुंबईसह राज्यातील अ, ब आणि क श्रेणीतील महापालिकांच्या प्रभाग रचना सोमवार, २५ ऑगस्ट रोजी जाहीर केल्या जाणार आहेत. प्रभाग रचनेची प्रक्रिया आणि वेळापत्रक महापालिकांकडून प्रारूप प्रभाग रचनेचे प्रस्ताव आयोगाकडे प्राप्त झाले आहेत. काही महापालिकांचे प्रस्ताव उशिरा मिळाल्याने प्रभाग रचना प्रसिद्धीला विलंब झाला आहे. आता, या प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर २२ ते २८ ऑगस्ट या कालावधीत हरकती आणि सूचना मागवण्यात येतील. या प्रक्रियेचे संभाव्य वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे: प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्धी आणि हरकती/सूचना: २२ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट हरकती आणि सूचनांवर सुनावणी: २९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर अंतिम प्रभाग रचना तयार करणे: सुनावणीनंतर प्राधिकृत अधिकारी प्रभाग रचना अंतिम करून नगर विकास विभागाला पाठवतील. अंतिम रचनेला मान्यता: २२ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर या काळात नगर विकास विभाग अंतिम प्रभाग रचना निवडणूक आयोगाला सादर करेल. अंतिम अधिसूचना: ३ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर या काळात राज्य निवडणूक आयोग अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करेल. कोणत्या महापालिकांच्या प्रभाग रचना जाहीर होणार?




राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांपैकी १० महापालिकांच्या प्रभाग रचनांचे प्रस्ताव आयोगाला मिळाले आहेत. यात मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, वसई-विरार आणि नवी मुंबई या प्रमुख शहरांचा समावेश आहे. सोमवारच्या प्रसिद्धीमध्ये यापैकी बहुतांश महापालिकांचा समावेश असेल.

'ड' वर्गाच्या महापालिकांच्या प्रभाग रचना ३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केल्या जातील. प्रभाग रचना जाहीर झाल्यावर स्थानिक पातळीवरील राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांची निवडणुकीची तयारी सुरू होईल.

## मोफत ब्यूटी पार्लर प्रशिक्षण केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालिताई देशमुख यांची भेट.

लातुर / प्रतिनिधी:- विलासराव देशमुख फाऊंडेशन च्या वतीने बाभळगाव येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी भेट दिली तसेच प्रशिक्षणार्थी महिला भगिणीसोबत संवाद साधला. विलासराव देशमुख फाउंडेशनने महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.ट्वेंटीवन ग्रीच्या संचलिका सौ.अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील महीलांना स्वयंरोजगार आणि स्वावलंबनासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत बाभळगाव येथे विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या वतीने महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्राची सुरूवात करण्यात आली असून या केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालिताई विलासराव देशमुख यांनी दि.२२ ऑगस्ट (शुक्रवार) रोजी सदिच्छा भेट दिली आणि या ठिकाणी प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थी महिला भगिनीशी संवाद साधला व महिलांनी या प्रशिक्षणातून स्वतःच्या पायावर उभे रहावे व आपली आर्थिक प्रगती करून घ्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ग्रामीण व शहरी भागात महिलांसाठी रोजगाराच्या संधी कमी असतात,या पार्श्वभूमीवर विलासराव देशमुख फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे.या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांना




पार्लर विषयीची प्राथमिक माहिती देऊन प्रशिक्षण दिले जात आहे. यामध्ये वॅक्सिंग,विविध हेअर कट, मॅनिक्युअर,पेडिक्युअर,थ्रेडिंग,मेकअप,फेशियल याविषयी प्रशिक्षण दिले जात आहे.महिला भगिनींनी या प्रशिक्षणाबद्दल विलासराव देशमुख फाऊंडेशनचे आभार मानले. यावेळी फाऊंडेशन च्या समन्वक संगीता मोळवणे गावचे उपसरपंच गोविंद देशमुख, मा उपसरपंच अविनाश देशमुख,गावातील प्रमुख व्यक्ती, ट्रेनर शबाना शेख,गजानन बोयने,प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या.

# संपादकीय

## ड्रॅगनची पावले अफगाणिस्तानकडे...

जगातील सामरिक व आर्थिक भू-राजकारण सतत बदलत असताना अफगाणिस्तान हे राष्ट्र पुन्हा जागतिक शक्तींच्या दृष्टीने आकर्षणाचे केंद्र बनले आहे. विशेषतः, चीनसारख्या जागतिक आर्थिक महासत्तेचा अफगाणिस्तानकडे ओढा वाढला आहे. अलीकडेच चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांची काबूलमधील परिषद ही बाब स्पष्ट करणारी आहे. यामागे भौगोलिक किंवा राजकीय कारणे नसून, आर्थिक कारणे आहेत.

चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी भारतासोबत मैत्रीचा सूर छेडल्यावर, लगेचच ते त्याला घेरण्याची तयारी करत आहेत. याचे लिखाण अफगाणिस्तानची राजधानी काबूलमध्ये सुरू झाले आहे. पाकिस्तान, चीन आणि अफगाणिस्तान या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी काबूलमध्ये त्रिपक्षीय बैठक घेतली. यात परस्पर सहकार्य वाढविणे आणि या भागातील सुरक्षा परिस्थितीवर चर्चा झाली. तालिबानचे कार्यवाहक परराष्ट्रमंत्री आमिर खान मुत्ताकी हे या बैठकीचे यजमान होते. तिन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांमध्ये ६ व्या त्रिपक्षीय परिषदेचे आयोजन झाले. या परिषदेतील चर्चेचा गाभा सीपेक (चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडोर)चा विस्तार हा होता. तसेच दहशतवादाच्या मुद्द्यावरही या देशांमध्ये चर्चा झाली. भारताचा दौरा करून थेट अफगाणिस्तानात पोहोचलेल्या वांग यी यांनी काबूलपर्यंत सीपेक नेण्याबाबत पुढील चर्चेला सुरुवात केली. याआधीची फेरी मे महिन्यात बीजिंगमध्ये झाली होती. त्यावेळी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांनी संबंध राजदूत स्तरावर नेण्याबाबत सहमती दर्शविली होती.

जगाच्या राजकीय नकाशावर अफगाणिस्तान हा एक लहानसा; पण महत्त्वाचा देश म्हणून ओळखला जातो. ऐतिहासिकदृष्ट्या, भौगोलिक दृष्टीने आणि आंतरराष्ट्रीय राजकीय गणितांसंदर्भात अफगाणिस्तानचे स्थान महत्त्वाचे आहे. मध्य आशियाच्या केंद्रस्थानी असणार्या अफगाणमध्ये अनेक साम्राज्यांची स्वप्ने रुजली आणि उद्ध्वस्त झाली. आजच्या आधुनिक युगातही, अफगाणिस्तानचे सामरिक महत्त्व कमी झालेले नसून, ते अधिकच वाढले आहे. अफगाणिस्तानने इतिहासात अनेक महाशक्तींना धूळ चारली आहे. आता हा देश चीनसाठी एक नवा सापळा बनण्याची शक्यता आहे.

तालिबानने पुन्हा देशाचा ताबा घेतला आणि अमेरिकेच्या जागतिक वर्चस्वाला धक्का बसला. जगातील सामरिक व आर्थिक भू-राजकारण सतत बदलत असताना अफगाणिस्तान हे राष्ट्र पुन्हा जागतिक शक्तींच्या दृष्टीने आकर्षणाचे केंद्र बनले आहे. विशेषतः, चीनसारख्या जागतिक आर्थिक महासत्तेचा अफगाणिस्तानकडे ओढा वाढला आहे. विशेषतः, दुर्मीळ खनिजांच्या विपुलतेमुळे अफगाणिस्तान अधिक महत्त्वाचा ठरत आहे. यासाठी चीन अफगाणिस्तानमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करत आहे. तालिबानच्या सत्तेच्या पुनःस्थापनेनंतर अफगाणिस्तानमध्ये खनिज आणि उत्खनन उद्योगाला वाढते धोरणात्मक महत्त्व प्राप्त झाले आहे. अफगाणिस्तानचा कब्जा घेतल्यानंतर तालिबानला आंतरराष्ट्रीय आर्थिक मदत तत्काळ थांबवली गेली, विदेशी ठेवी गोठवल्या आणि अफूच्या लागवडीवर निर्बंध घातले . यामुळे तालिबानने देशाच्या अंतर्गत साधनसंपत्तीकडे वळण्याची गरज ओळखली आहे. विशेषतः, खनिज साठ्यांचा वापर केवळ आर्थिक स्रोत म्हणून नव्हे, तर जागतिक राजकारणात सौदेबाजीचे माध्यम म्हणून केला जात आहे.

अफगाणिस्तानमध्ये लोखंड, तांबे, लिथियम, कोळसा, युरेनियम, नैसर्गिक वायू आणि तेलाचे विपुल साठे आहेत. भूगर्भीय सर्वेक्षणानुसार, संपूर्ण देशभरात सुमारे १४०० पेक्षा अधिक खनिज साठे सापडले असून, त्यांची एकूण अंदाजित किंमत १ लाख कोटी अमेरिकी डॉलरच्या पुढे आहे. हाजिगक भागातील लोखंड, मेस अयनक येथील तांबे आणि गझनी, नूरिस्तान व हेलमंडमधील लिथियम साठे हे जागतिक बाजारपेठेतील दृष्टिकोनातून मौल्यवान मानले जातात. याशिवाय सेरेपोल, शेबरघान व अमु दर्या परिसरात सुमारे ४७ तेलविहिरी आहेत. या क्षेत्रात सुमारे दीड लाख लोकांना अधिकृतरीत्या रोजगार उपलब्ध झाला आहे.

स्थानिक गुंतवणूक सुमारे १० अब्ज डॉलर इतकी असून, परकीय थेट गुंतवणूक सात अब्ज अमेरिकी डॉलरच्या पुढे गेली आहे. त्यामुळे हा उद्योग आर्थिक आणि सामाजिक दोन्ही दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर लिथियम, तांबे आणि दुर्मीळ पृथ्वी मूलद्रव्यांवरील वाढत्या मागणीमुळे अफगाणिस्तानचे भू-आर्थिक महत्त्व लक्षणीयरीत्या वाढले आहे. चीन, भारत, रशिया, इराण, पाकिस्तान, उझबेकिस्तान अशा अनेक देशांनी येथे स्वारस्य दाखवले आहे. मात्र, तालिबान कोणत्याही एका राष्ट्राला पूर्णपणे प्रवेश देण्यास तयार नसून, संसाधनांचा वापर आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवण्यासाठी करीत आहे. चीनने सध्या तरी उत्तरेतील तेलसाठ्यांवर २५ वर्षांचा उत्खनन करार केला असून, मेस अयनकमधील तांबे प्रकल्पात दीर्घकालीन स्वारस्य दाखवले आहे. चीनचे लिथियमविषयीचे स्वारस्य हे त्याच्या तांत्रिक सुरक्षिततेचा भाग आहे. या क्षेत्रात चीन अफगाणिस्तानला बेल्ट अँड रोड उपक्रमाशी जोडण्याचा प्रयत्न करीत आहे. स्कॉट वर्डन या अमेरिकन संशोधकाने असा इशारा दिला आहे की, चीन अफगाणिस्तानमधील दुर्मीळ धातूंच्या अपूर्ण शोषित साठ्यांवर प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्याचबरोबर त्यांनी ट्रम्प प्रशासनाच्या युनायटेड स्टेटस् इन्स्टिट्यूट ऑफ पीस (यूएसआयपी) संस्थेच्या बंदीवरही टीका केली आहे. त्यांच्यामते, ही कारवाई चीनला मध्यपूर्वेत फायद्याची ठरू शकते.

चीन आतापर्यंत अफगाणिस्तानातील लष्करी हस्तक्षेपापासून दूर राहिला होता; पण तालिबानच्या सत्तेवर पुनरागमनानंतर चीनने सतर्क, पण महत्त्वाकांक्षी दृष्टिकोन स्वीकारला आहे. चीनने अफगाणिस्तानात कोट्यवधी डॉलरची गुंतवणूक केली आहे. यातील सर्वात मोठी गुंतवणूक अमु दरिया खोर्यातील तेल उत्खननासाठी आहे. यासाठी चिनी कंपनी सीएपीईआयसीने जानेवारी २०२३ मध्ये २५ वर्षांसाठी ५४० दशलक्ष डॉलरचा करार केला. याव्यतिरिक्त, मेस ऐनाक तांब्याच्या खाणीत ३.५ अब्ज डॉलर आणि लिथियम खननात १० अब्ज डॉलरच्या प्रस्तावित गुंतवणुकीची चर्चा आहे. चीनने सौर ऊर्जा, रस्ते बांधणी आणि फायबर ऑप्टिक केबलसारख्या पायाभूत सुविधांमध्येही गुंतवणूक केली आहे. मात्र, सुरक्षेच्या धोक्यांमुळे आणि मूलभूत सुविधांच्या अभावामुळे या प्रकल्पांची गती मंदावली आहे. 'सीपेक'द्वारे मजबूत उपस्थिती सिद्ध केल्यानंतर चीन या प्रकल्पांना वेग देऊ इच्छितो.

# दारुड्याकडून किती माता मारल्या जाणार

आपल्या राज्यात दारू उत्पादन आणि दारू विक्रीला परवानगी आहे. कारण दारू पासून आपल्या सरकारला कर मिळत असतो त्यामुळे दारू पिणाऱ्या लोकांची संख्या दिवसे दिवस वाढत आहे. ती सरकारच्या फायद्याची आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. त्यापैकी काही लोक तर दारूच्या एवढे आहारी गेलेले आहेत की ते आपल्या मूला बाळांचा अगर आपल्या संसाराचा विचार करीत नाहीत. कायम दारूच्या नशेमध्ये गुंग असतात. दारू पिण्यासाठी पैसे मिळतील याचा ते प्रयत्न करीत असतात. त्यामुळे अशा दारुड्याची बायको सुद्धा मुलांना घेऊन तिच्या माहेरी जात असते.

कारण तो दारूच्या नशेत बायकोला मारत असतो. मागे एकदा एका नराधम दारुड्या मुलाने तर आईने दारूपिण्यासाठी पैसे दिले नाहीत म्हणून आईचा खून करून तिचे काळीज काढून त्याचे तुकडे करून तव्यात परतून खात असलेली बातमी वाचनात आलेली होती त्याला फाशीची शिक्षा झालेली आहे. अशा दारुड्यांची संख्या कमी की काय म्हणून पुण्यामध्ये घडलेली एक बातमी दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी वाचनात आलेली आहे ती तुम्ही सुधा वाचली असेल ती अशी की, पोटच्या मुलानेच आईच्या छातीत भोसकला चाकू .दैवरूपी डॉक्टरांनी ' सावित्री ' चे प्राण ' यमा' च्या तावडीतून परत आणले.

पुणे : भविष्याची स्वप्ने रंगवत गाढ झोपी गेलेल्या ५५ वर्षीय आई नावाच्या जन्मदात्रीला एकुलत्या एक असलेल्या मुलानेच छातीत भोसकून जीवे मारण्याचा केलेला प्रयत्न... मात्र प्रचंड रक्तस्त्राव होऊ लागल्याने नातेवाईकांनी हात टेकले..आणि रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात आणण्यापूर्वीच रक्तदाब कमी होऊन हृदय बंद पडलेले... छातीत खोल जखम असल्याने सीपीआर देणेही आव्हानात्मक असताना देवाची उपमा लाभलेल्या देवरूपी डॉक्टरांनी हार न मानता शर्थीचे केलेले प्रयत्न आणि जणू यमाच्या तावडीतून या माऊलीची सुटका करून देत जीवदानरूपी दान पदरात पाडून घेतल्याची चमत्कारिक घटना पुण्यात नुकतीच घडली आहे.

पुण्यातील सिंहगड रोडवरील एका वसाहतीत राहणाऱ्या सावित्री ( नाव बदलेले आहे ) या आपल्या लेकराबाळासह गुण्या गोविंदाने प्रपंचाचा गाडा हाकणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील गृहिणी. मात्र, या घराला कोण जाणे कोणाची नजर लागली.. त्यांचा वंशाचा दिवा असणारा मुलगाच जो दारूच्या आहारी गेला होता. श्रतोच त्यांचे जीवावर उठला होता. यां ना त्या कारणाने तो सातत्याने सावित्रीचे रूप घेऊन आलेल्या आईला मारहाण करत असे. पाच दिवसा पूर्वीही किरकोळ कारण पुढे करून या वंशाचे दिव्याने भविष्याची स्वप्ने रंगवत गाढ झोपी गेलेल्या आईच्या छातीत धारदार अशा वस्तूंने भोसकले.

छातीत काहीतरी घुसले आहे म्हणून डोळे उघडताच सावित्रीला आपल्या जीवावर दुसरा-तिसरा कोणी नाही तर आपला वंशाचा दिवाच उठला आहे. हे दिसले आणि ती रक्ताच्या थारोळ्यात किंकाळू लागली. हे किंकाळने ऐकून घरातील अन्य सदस्य जागे झाले आणि त्यांनी तातडीने रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सावित्रीला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र , छातीत धारदार शस्त्र घुसल्यामुळे सावित्रीच्या जगण्याची डॉक्टरांनाही खात्री नव्हती. म्हणून त्यांनी सावित्रीला या ठिकाणाहून हलवा ,असे सांगितले आणि नातेवाईकांनी आता सावित्री वाचणार नाही म्हणून हंबरडा फोडायला सुरुवात केली.

पण, त्यातीलच एका नातेवाईकांने भारती रुग्णालयात दाखल करून प्रयत्न करू म्हणत तातडीने. सावित्रीला भारती रुग्णालयात दाखल केले. भारती रुग्णालयाच्या आपत्कालीन विभागात सावित्री आली तेव्हा तिचा रक्तदाब कमी होऊन हृदय बंद पडले होते. छातीत खोल जखम असल्याने सीपीआर देणेही आव्हानात्मक होते. पण त्याशिवाय पर्याय नव्हता. त्या अवस्थेतही देवाची उपमा लाभलेल्या डॉक्टरांनी बंद पडलेले हृदय सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या. तातडीने सावित्रीला कॅथ लॅबमध्ये हलवण्यात आले. २ डी इको केल्यानंतर हृदयाच्या भोवती रक्त साचलेले निदर्शनास आले. त्यामुळे परत हृदय बंद पडण्याचा धोका होता.

प्राण वाचण्यासाठी त्वरित छातीचे ऑपरेशन करणे गरजेचे होते. नातेवाईकाशी बोलून भारती हॉस्पिटलचे कार्डियाक सर्जन डॉक्टर विजय नटराजन आणि जनरल सर्जन डॉक्टर बिजू वर्गीस यांच्या टीमने ऑपरेशनची तयारी सुरू केली अशा सर्जरीसाठी मोठ्या प्रमाणात रक्ताची गरज लागते. त्यामुळे दहा बाटल्या रक्त रक्तपेढीत राखीव ठेवण्यात आले. ऑपरेशन साठी छाती उघडल्यावर सावित्रीच्या हृदयाच्या उजव्या बाजूला चाकू मुळे साधारण १.५ सेंटीमीटर ची चीर पडल्याचे निदर्शनास आले. त्यातून छातीत रक्तस्राव होत होता. ते रक्त हृदयाच्या सभोवती साचत होते. छातीत साधारण ५०० मिली रक्त साठले होते. ते साफ करून बाकीची प्रक्रिया करण्यात आली. सुदैवाने फुफुस, लिव्हर या दुसऱ्या अवयवांना इजा झाली नव्हती. ऑपरेशन व्यवस्थित झाले. पण पुढचां धोका होता तो या सर्व प्रक्रिया करताना मेंदूला काही इजा झाली आहे का, हे पाहण्याचा. त्यासाठी सावित्री शुद्धीत येणे गरजेचे होते. तपासणीअंती व सावित्री शुद्धीत आल्यावर मेंदूला इजा नसल्याचे निष्पन्न झाले आणि देवरूपात वावरणाऱ्या डॉक्टरांनी साक्षात यामाच्या तावडीतून सावित्रीचे प्राण परत तिच्या पदरात जीवदानरुपी चमत्कारीक घटना घडली आहे. मेडिकल डॉयरेक्टर डॉक्टर संजय ललवाणी म्हणाले की सावित्रीचे प्राण वाचवण्यात आम्ही यशस्वी झालो. याचा आनंद आहे.

भारती हॉस्पिटलमध्ये प्रत्येक टप्प्यावर सावित्रीला मदत करण्यात आली. त्यामुळे ही सर्व प्रक्रिया एक तासात झाली. या कामी आपल्या आपत्कालीन विभागाच्या क्लीनिकल हेड डॉक्टर श्र्वेता त्यागी, आयसीयू विभाग, ब्लड सेंटर या सर्व टीमचे सहकार्य प्रत्येक टप्प्यावर मोलाचे ठरले. तसेच तातडीच्या काळात कुठेही पैशाची मागणी न करता महात्मा फुले जनआरोग्य योजनेतर्गत सर्व उपचार केले. वरील बातमी वाचल्या नंतर दारूच्या व्यसनामुळे माणूस हिंस्त्र पशूला सुद्धा लाज वाटेल अशी कृती करे असल्याचे दिसून आलेले आहे. त्यामुळे दारुड्याकडून किती माता मारल्या जाणारव हा प्रश्न तुमच्या मनात उभा राहिलेला आहे.

------------

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# कलावंता मधील माणिक मोती, - कवी : माणिक कोकाटे

दिलदार दिलखुलास व्यक्तिमत्व

कवी माणिक कोकाटे हे गायिका मैनाताई कोकाटे यांचे ते पती. पंचवीस वर्षापूर्वी दिवाळीच्या सुट्टीत त्यांच्याकडे माझा भाचा गायक प्रविण मोहिते सोबत गेलो. पहिल्या भेटीतच या उभयतांनी, त्यांच्या मुलांनी, कविवर्य गुरुवर्य सोपान कोकाटे, यांनी एखाद्या नातेवाईक प्रमाणे आदरातिथ्थ केले. उभं आयुष्य कलेसाठी, प्रबोधन कार्यासाठी वाहिलेल्या या कलावंताला आज मुंबईत हक्काचा निवारा नाही, अनेक अडीअडचणीवर , प्रसंगावर मात करून हार न मानता जिद्दीनं आपल्या लेकरांचा सांभाळ केला. कलेच्या माध्यमातून मिळणारे अल्प मानधन, मुलांच संगोपन, आजारपणाने ते खचलेले नाहीत. आम्ही बुद्ध - फुले - शाहू - आंबेडकर, या महापुरुषांचे विचार, भीमाई - रमाई - सावित्री माईचा आदर्श समाजात सांगतो, समाजाच प्रबोधन करतो. रस्त्यावर, रेल्वे स्टेशन बाहेर बसून गाणी गायली, गाण्याच्या छोट्या पुस्तिका छापल्या, पन्नास पैशाला, पाच रुपया पर्यंत पुस्तकं विकली छपाईचा खर्च, कधी व्याजाने पैसे काढून कॅसेट सी डी काढल्या, त्यांचा अल्प फायदा तर कधी तोटाही झाला. पण समाजाने आम्हाला आजवर जगविले आहे. हक्काच घर नाही, मुलांना योग्य शिक्षणं देणं जमले नाही. परिवर्तन चळवळीत गायनाच्या रूपाने योगदान दिलं आहे. कधी वाईट प्रसंग, अनुभव आले तरी खचलो नाही. कविवर्य माणिकजी कोकाटे अनेक अनुभव, आठवणी सांगतात. तेव्हा मनात विचार येतो की या अशा ध्येयवेड्या कलावंतांनी चळवळ अभेद राहण्यासाठी आपली हयात खर्ची घातली पण या कलावंताच्या वाट्याला उपेक्षा आलेली दिसते, समक्ष, बोलण्यातून त्यांचं आयुष्यं कळले. माणिक दत्तू कोकाटे हे संपूर्ण नावं वडील दत्तू सदाशिव कोकाटे, आई दगडूबाई कोकाटे. माणिकजी मोठे, मोतीराम, संपती, फुलचंद हे भाऊ आणि प्रभावती, शोभावती या बहिणी. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात केज तालुक्यात पळसखेड हे मूळ गावं जन्म तिथलाच. नऊ दहा माणसाच कुटुंब स्वतःची शेती नाही. मिळेल ती मजुरी आई वडील यांनी केली, रस्त्यावर खडी टाकणं, गटारे साफ करणे, दुसऱ्याच्या शेतात काम, गुरे राखणे, प्रसंगी मागून खाणे. सहा मुलांचा सांभाळ करणे, शिक्षण देणं अवघड होत. तरीही वडिलांनी मुलांना शाळेत दाखल केली. १९७१/७२साली दुष्काळ पडला अशा वेळी जगण्यासाठी मिळेल ते काम, कष्ट केले, कामाच्या बदल्यात पैश्या ऐवजी कुणी शीळ अन्न दिलं ते खाल्ल. शिक्षणाची आवड होती पण पाटी पेन्सिल देणारं कोण ? त्यांच्या आईची आई सावित्री संभाजी गायकवाड अंगणवाडी शिक्षिका होती. तिनं आपल्याकडे बनसारोळाला नातवाला शिक्षणासाठी नेले. चवथी पर्यंत शिकले पुढे शाळाच शिकायची नाही जेवण नाकारलं, बिचाऱ्या आजीने दुसऱ्या दिवशी सोयर्याच, लेकीच पोरं तिच्या स्वाधीन करण्यासाठी दहा बारा मैल चालत आईकडे आणून दिले. आईने शिकत नाहीस ना मग राख गुरे नी राब लोकांच्या शेतात म्हणून गावात सालगडी वर्षाला सव्वा शे रुपयात कामाला ठेवले. शाळे पेक्षा हे बरं समजून कामाला गेले पण दिवसभर रानात गुरे राखून संध्याकाळी गटारा शेजारी बसवून शीळ अन्न खायला दिले. त्या बालवयात त्यांचा स्वाभिमान जागा झाला. नको असले काम आपण शाळा शिकायची ठरविले पुन्हा आजीकडे आले. १९७१ मधील दुष्काळ मुळे वडिलांची बहीण रुक्मिणी बळीराम बनसोडे, आईची आत्या शेसाबाई भागोजी शिंदे यांच्या मुळे मुंबईत आलो, मुंबईत येताना त्यांची जी वाताहत झाली गावाकडून बार्शी पर्यंत चालत, ट्रेनचा प्रवास, खंडाळा, कल्याण अशी दरमजल केली, चेंबूर, कुर्ल्यात राहिले. वडिलाना मग खरा आधार दिला तो चुलते कविवर्य सोपान अण्णा कोकाटे, आत्या जेष्ठ गायिका चंद्रकला गायकवाड यांनी. त्यांनी आमच्या कुटुंबाची अवस्था पाहिली. सोपान अण्णांनी वडिलांना सांगितलं मुलांना जगण्याची कला मी शिकवितो, वादन गायन करून ती पोट भरतील, अण्णांनी आम्हाला घाटकोपर मध्ये आणलं, झोपड बांधून दिले. सोपान अण्णांचे वडील आणि आईने आमच्यासाठी सव्वाशे रुपयाचा तबला नी तीनशे रुपयांची हार्मोनियम आंबेजोगाई मधून आणली. अण्णांनी आम्हाला स्वतः तबला वादन, गायन शिकविले त्यामुळं मोतीराम तबला नी फुलचंद संगीत नी मी स्वतः गायला शिकलो, त्याचं बरोबर अण्णांच्या मार्गदर्शकाने गाणी लिहायला शिकलो, शिक्षण पाचवी पण सोपान अण्णांनी गुरुजींची नी गुरूची भूमिका घेतली तेच आमच्या साठी शाळा बनले. दादर, करिरोड, चिंचपोफकी, मानखुर्द, घाटकोपर भांडुप, मुलुंड, ठाणे व्हीटी, कुलाब्यात फिरून आठवड्याचे सर्व वार गाण गाऊन पोट भरलं, पाच दहा रुपयात दिवसांची कमाई व्हायची येताना तांदूळ, डाळ, पीठ, तेल, मसाला, आणत असू. हे सर्व सांगत असतांना, ऐकताना, पोटासाठी गाण ज्यांनी शिकवलं जगण्याचा आधार नी चळवळीचा विचार ज्यांनी दिला ते सोपान अण्णांच्या दूरदृष्टीच कौतुक वाटतं. हे सोप काम नाही. हा त्याग आहे. रस्त्यावर बसून गाणं, अशा खडतर कटू अनुभवातून त्यांची लेखणी फुलत गेली. मुंबईच्या काना कोपऱ्यात त्यांनी कार्यक्रम केले संपूर्ण महाराष्ट्रात कलेसाठी वणवण केली, स्वाभिमान जपलं, मोर्चे निदर्शने, नामांतर, अन्याय अत्याचार विरूद्ध गीतातून आवाज उठवून लोकांना जागृत करण प्रबोधन करणारे असे अनेक कलावंत आहेत. नोकऱ्या मिळतं पण या कलावंतांनी त्या केल्या नाहीत. आहे त्यात समाधानी असले तरी अल्पशिक्षित व्यक्ती वैचारिक, क्रांतिकारी, महापुरुषांचे जीवनचरित्र सांगणारी, परिवर्तन विचारांची गाणी लिहिते, प्रज्ञाशील गीते, विकास गीते बारा, बारा भागात, क्रांती गीते, भीमाई रमाई गीते, शेकडो कॅसेट, सी डी, व्हिसिडी, कर्ज काढून काढते तेव्हा त्यांचा आदर वाटतो, कविवर्य माणिक कोकाटे. त्यांच्या यशात सोपान कोकाटे, गायिका पत्नी मैना कोकाटे, बंधू संगीतकार फुलचंद कोकाटे अशा अनेक घाटकोपर असल्फा, महाराष्ट्र मधील ज्येष्ठ प्रख्यात कवी गायक कलावंत बंधुभगिनीचा त्यांनी आदराने नामोल्लेख केला. त्यात दत्ता शिंदे, विष्णू शिंदे, गोविंद गाडे, सुषमा देवी, वैशाली शिंदे अशी प्रातिनिधीक नावे आहेत. कला क्षेत्रात या उभयतांना मैना राघुची जोडी असे गंमतीने म्हणतात. पण ही जोडी खरंच आदर्श नी आदरणीय आहे. समोरील नव्या जुन्या कलावंत यांचा ते आदर करतात त्यांना प्रोत्साहन मार्गदर्शन करतात. आपल्या सोबत कार्यक्रम देतात. त्यामुळं त्यांचा कलावंत मित्र परिवार मोठा आहे. मोठी मुलगी संगीता, सुजाता, सरिता, संविधान, आदर्श ही त्यांची कला वारसा जपणारी मूल. मोठ्या मुलीच्या संगीताच्या दिर्घ आजारपणात त्यांनी लाखो रुपये खर्च केले तिच्या आकस्मिक जाण्याच्या दुःख त्यांना आजही बेचैन करत, अश्रू अनावर होतात. त्यांचा वादन, गायन, लेखन वसा आदर्शने घेतला आहे. कोकणातील अनेक कलावंत विषयी ते आदराने बोलतात, सर्वांनी कोकणात कार्यक्रम निमित्ताने बोलावले आपणही बऱ्याच जणांना कार्यक्रम दिले त्यांची गीते पुस्तकं कॅसेट मध्ये घेतल्याचं सांगतात. साहेबराव कोकाटे, वामन दादा,प्रल्हाद शिंदे, विठ्ठल उमप, गोविंदराव म्हशीलकर, जनार्दन धोत्रे, बी टी कदम, नवनीत खरे, रमेश येलवे प्रतापसिंग बोदडे, लक्ष्मण राजगुरू, श्रावण यशवंते, पोखरिकर दादा, रुपचंद भुजबळ, शकुंतला जाधव, गौतम धुमाळ, विजय सरतापे,यांच्या गायकी, लेखनाचे स्मरण त्यांनी केले. त्यांना नामांकित यांनी सहकार्य केले तसेच त्यांनीही अनेक नामवतांना आपल्या कॅसेट सी डी त्यांची गाणी घेऊन, कुणाला गायलाही दिले यात त्यांनी नवोदित प्रसिद्ध देशस्थ, कोकणी, प्रांत भेद केलेला नाही,परिवर्तन कला महासंघ, सम्यक कोकण कला संस्था, बहुजन हितवर्धक कला संस्था ज्या ज्या कलावंतांच्या हिताचं काम करत आहेत या सर्वप्रती आदर आहे.अशा उदार, प्रेमळ, सदा हसमुख कलाकार. त्यांच्या कॅसेट, सी डी, व्हिसिडीत माझ्यासह अनेक नवोदित यांची गाणी घेतली आहेत.

शाक्य आणि कोलीयांनो
मुडदे पाडता कशाला
तुम्ही भाऊ भाऊ
पाण्यासाठी भांडता कशाला.
जीवनभर कर्तव्याला जागायचं
महिलांनो रमाई परी वागायचं
भीमाई रमाई कॅसेट मधील त्याची गीते
इतिहासाचे बोले पान कर्तृववान महिलांवर आधारीत त्यांची गाणी
भीम बाप आणि माय
तुला कळलं का नाय
तू बेईमान झालास काय
नका होऊ अंध, बंद डोळे ठेवा उघडे हो..

बना तुम्ही मानवतेचे भक्त तुमचे आमचे वेगळे आहे का रक्त सामाजिक आशय असणारी सर्व सामान्य लोकांच्या मनातली व्यथा त्यांनी अशा गीतात लिहिलीच पण त्यांची लोकगीत सुद्धा मनोरंजन प्रबोधन करणारी आहेत. या उभयतांचे माझे बंधुत्वाचे संबंध आहेत. त्यांना सहकार्य करणारे, किंवा त्यांनी ज्यांना सहकार्य केले असे शेकडो कलावंत, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील, जवळच्या नातेवाईक कलावंत यांचा नामोल्लेख त्यांनी सांगूनही लेख मर्यादेमूळ मी केलेला नाही. माणिक कोकाटे यांनीही सुरुवातीस गायन कार्यक्रम केलेत, आपल्या पत्नीला ते गीत, कोरस उत्तम साथ देतात. त्यांनी असच लिहित गात इतरांना सहकार्य देतं राहावं यासाठी त्यांना शुभेच्छा..!

आज घडीला आयु. माणिक कोकाटे यांच्या अर्धांगिनी महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका : मैनाताई कोकाटे यांची खूपच हलाखीची परिस्थिती झाली आहे व त्यांची तब्येत पण खालावलेली आहे असा खडतर संघर्षमय प्रवास चालू आहे अशा त्यांना उपचारासाठी समाजातील दानशूर व्यक्तीने सढळ हस्ते मदत केली तर नक्कीच त्यांना उदंड आयुष्य लाभेल व पुन्हा ते जोमाने समाजप्रबोधन करतील हीच सदिच्छा..! कलावंता मधील माणिक मोती, माणिक कोकाटे यांचा मोबाईल नंबर-

*********
९५९४६०७३५८,

आठवणींच्या गोष्टी
- राष्ट्रपाल भा. सावंत
(९४०३१४४३५६)

# ११३ वर्षे जुने चर्च जसेच्या तसे हलवले!

ऐतिहासिक वास्तू या त्या त्या देशांचा एक समृद्ध वारसा असतो. त्यांचे जतन करणे, हे त्या देशातील सरकारचे नाही, तर त्या देशातील नागरिकांचे आद्यकर्तव्यच असते. या वास्तू प्रत्येक देशाचा इतिहासच जगासमोर मांडत असतात. अशीच एक स्वीडनमधील वास्तू अर्थात चर्च अन्य ठिकाणी हलवला. स्वीडनच्या उत्तरेकडील किरुना शहरात एक अविश्वसनीय दृश्य पाहायला मिळाले. खाणकामामुळे खचणार्या जमिनीपासून वाचवण्यासाठी, सुमारे ११३ वर्षे जुने आणि ६७२ टन वजनाचे एक भव्य लाकडी चर्च जसेच्या तसे उचलून दुसर्या ठिकाणी नेले. हा ५ किलोमीटरचा प्रवास म्हणजे केवळ एक अभियांत्रिकी चमत्कार नव्हता, तर स्थानिक नागरिकांसाठी एक भावनिक क्षण होता. ज्याचे साक्षीदार होण्यासाठी हजारो लोक रस्त्याच्या दुतर्फा जमले. १९१२ मध्ये बांधलेले हे लाल रंगाचे भव्य चर्च, किरुनाच्या ओळखीचा एक अविभाज्य भाग होता. मात्र, शंभर वर्षांहून अधिक काळ चाललेल्या लोहखनिजाच्या खाणकामामुळे शहराच्या जुन्या केंद्राखालील जमिनीला भेगा पडण्याचा धोका निर्माण झाल्याने, त्यामुळे शहरच



हळूहळू नवीन ठिकाणी वसविण्यात येत असून, या चर्चचे स्थलांतर हा या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा होता. प्रार्थना संपताच, भव्य ट्रेलरच्या इंजिनांचा गडगडाट सुरू झाला आणि महाकाय चर्चने हळूहळू जागा सोडली. ताशी केवळ ५०० मीटरच्या वेगाने झालेला हा प्रवास पूर्ण होण्यासाठी दोन दिवसांचा कालावधी लागला. जमलेल्या लोकांनी श्वास रोखून हा क्षण अनुभवला. सुरक्षा कठडे असूनही, चर्च इतक्या जवळून जात होते की जणू हात लांबवून त्याला स्पर्श करता येईल, असे अनेकांनी सांगितले. केवळ किरुना अथवा स्वीडनमधूनच नाही, तर जगभरातून लोक जमले होते. जणूकाही डोळ्यांदेखत इतिहास घडत आहे. हे चर्च जसेच्या तसे हलवणे, हे एक मोठे अभियांत्रिकी आव्हान होते. ही एक गुंतागुंतीची मोहीम होती, जिथे चुकीला वाव नव्हता. या चर्चची उंची ३५ मीटर , रुंदी ४० मीटर , वजन ६७२ टन आहे. स्टीलच्या बीमवर आधार देऊन, सेल्फ-प्रोपेल्ड मॉड्युलर ट्रान्सपोर्टर्स नावाच्या विशेष ट्रेलरवर उचलून चर्चचे स्थलांतर झाले. चर्चच्या रुंदीमुळे रस्ता २४ मीटरपर्यंत रुंद करण्यात आला. तसेच रस्त्यातील विजेचे खांब, ट्रॅफिक सिग्नल आणि एक जुना पूलही हटवला. स्वीडनच्या राजघराण्यातील प्रिन्स युजेन यांनी बनवलेले वेदीवरील भव्य चित्र भिंतीवर चिकटवलेले असल्याने ते काढणे अशक्य होते. त्यामुळे ते चित्र आणि १,००० पाईप्स असलेले ऑर्गन, दोन्ही गोष्टी चर्चमध्येच पूर्णपणे सुरक्षित करून हलवले. या चर्चसोबत लोकांच्या सुख-दुःखाच्या आठवणी जोडलेल्या आहेत. त्या आठवणींनाही सोबत घेऊन भविष्याकडे जात असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

# घरफोडीच्या व साखर कारखान्यातील गन मेटल चोरी गुन्ह्यातील आरोपीला अटक. १८ गुन्हे उघड.

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई






लातूर :- घरफोडीच्या व साखर कारखान्यातील गन मेटल चोरी गुन्ह्यातील आरोपीला १५ लाख ८२ हजार रुपयाच्या मुद्देमालासह अटक. १८ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.✽

याबाबत थोडक्यात माहिती की, काही दिवसा पासून जिल्ह्यात रात्रीच्या चोरीच्या घटना घडल्या होत्या. तसेच विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये जनावर चोरी, साखर कारखान्यातील गनमेटल च्या वस्तू चोरीच्याही घटना घडल्या होत्या. त्यावरून विविध पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात आरोपीता विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात होते.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी शेतकऱ्या च्या माला विरूद्ध होणारे गुन्हे कारखान्यातील चोरीचे गुन्हे उघडकिस आणण्याकरिता आदेशित केले होते .पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे दोन पथके तयार करून नमूद गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता.

सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना पथकाला रात्रीच्या वेळी चोरी करणाऱ्या, तसेच जनावर व साखर कारखान्यातील गनमेटल च्या वस्तू चोरी करणाऱ्या आरोपीची माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून दिनांक २१ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता पथकांनी मुरुड येथील बायपास रस्त्यावरील रेल्वे स्टेशन चौक परिसरात सापळा लावून दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतल. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांने त्यांचे नाव १) रमेश उद्धव चव्हाण, वय २६ वर्ष, राहणार राजेश नगर ढोकी, जि. धाराशिव. २) शिवाजी लाला काळे, वय ४५ वर्ष, राहणार वाटवडा ता.जि. धाराशिव सध्या राहणार राजेश नगर ढोकी, जि.धाराशिव .

असे असल्याचे सांगितले. त्याच्या कडे असलेल्या बॅगची तपासणी केली असता सदर बॅगमध्ये ०९ लाख २५ हजार रुपये रोख रक्कम मिळून आली. सदर रकमेबाबत विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांच्या इतर साथीदारासह मिळून लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये रात्रीच्या वेळी घरा घुसून चोरी केली असून अनेक पोलीस ठाण्याच्या हद्दी मधून शेळ्या, म्हैस तसेच साखर कारखान्यातील गन मेटल च्या वस्तू चोरल्याचे कबूल केले. व सदरची रक्कम ही विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये जनावर व सोन्या-चांदीचे दागिने चोरून ते विकून त्यामधून मिळवलेली असल्याचे कबूल केले.

तसेच पोलीस ठाणे किल्लारी, भादा व नांदेड जिल्ह्यातील बारड येथील साखर कारखान्यामधील गन मेटल च्या वस्तू त्यांच्या अन्य साथीदारासह मिळून चोरी करून ते भंगार दुकानदार ३) मुक्तार मौला पठाण, वय ४२ वर्ष, राहणार तुकाई नगर, मुरुड.

याला तसेच आणखीन एक बार्शी येथील भंगार खरेदी दुकानदाराला विक्री केल्याचे सांगितले आहे. त्यावरून वर नमूद मुरुड येथील दुकानदारा कडून ०१ टन ०७ किलोग्रॅम इतक्या वजनाचे अंदाजे ०६ लाख ५७ हजार ४५६ रुपये किमतीचे भंगार जप्त करण्यात आले आहे.

तसेच लातूर जिल्ह्यातील घडलेल्या चोरीच्या गुन्ह्याच्या अभिलेखाचे पाहणी केली असता पोलीस ठाणे भादा हद्दीतील घरफोडी,जनावर चोरी, तसेच साखर कारखान्याच्या गन मेटल च्या वस्तू चोरीचे असे ०३ गुन्हे, पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण, कासारशिरशी येथील प्रत्येकी ०३ गुन्हे, पोलीस ठाणे चाकूर व देवणी येथील प्रत्येकी ०२ गुन्हे तर पोलीस ठाणे अहमदपूर, उदगीर शहर, निलंगा, किल्लारी व नांदेड जिल्ह्यातील बारड पोलीस ठाण्यातील प्रत्येकी ०१ असे एकूण १८ गुन्हे उघडकीस आले असून नमूद आरोपीकडून एकूण १५ लाख ८२ हजार ४५६ रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

नमूद आरोपींनी त्यांच्या अन्य १२ साथीदारासह वर नमूद पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये चोरी करून त्यात चोरलेला मुद्देमाल विकून मिळवलेली त्यांच्या हिश्याला आलेली नमूद रक्कम जप्त करण्यात आली आहे.

नमूद गुन्हेगार हे धाराशिव जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांना पुढील कार्यवाही करिता पोलीस ठाणे किल्लारी यांच्या ताब्यात देण्यात आले असून ते सध्या पोलीस कोठडीमध्ये आहे. त्याच्याकडून आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून त्याच्या सोबतच्या साथीदारांचा तसेच भंगार खरेदी करणाऱ्यांचा दुकानदाराचा शोध पोलिस पथक घेत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे,सफौ. सर्जेराव जगताप, पोलीस अमलदार माधव बिलापट्टे, रामलिंग शिंदे, नवनाथ हासबे, राजेश कंचे,प्रदीप स्वामी, तुराब पठाण, गणेश साठे, मोहन सुरवसे, रियाज सौदागर, युवराज गिरी, अर्जुनसिंग राजपूत, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, महादेव शिंदे, गोविंद भोसले, शैलेश सुळे, हरी पतंगे,व्यंकटेश निटुरे, प्रदीप चोपणे, श्रीनिवास जांभळे, महिला पोलीस अमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

## दुपारच्या जेवणात काय बनवावं सुचत नाही? मग झटपट बनवा काळ्या चण्यांचा भात, नोट करून घ्या रेसिपी



दुपारच्या जेवणात नेहमीच वरण भात, चपाती भाजी खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन आणि टेस्टी पदार्थ खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. अशावेळी बाहेरून चायनीज किंवा इतर वेगवेगळे पदार्थ आणून खाल्ले जातात. मात्र पण सतत तिखट तेलकट पदार्थ खाल्यामुळे आरोग्याला हानी पोहचण्याची जास्त शक्यता असते. दैनंदिन आहारात कायमच हेल्दी आणि सहज पचन होणाऱ्या पदार्थांचे सेवन करावे. यामुळे शरीराची पचनक्रियासुद्धा निरोगी राहण्यास मदत होते. अनेक घरांमध्ये दुपारच्या जेवणात चपाती भाजी खाल्ली जाते. पण आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये काळ्या वाटाण्यांचा भात बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. काळ्या वाटाण्यांमध्ये प्रथिने, जीवनसत्वे, खनिजे आणि इतर पौष्टिक घटक आढळून येतात. त्यामुळे आहारात काळे वाटणे खावेत. चला तर जाणून घेऊया काळे चण्यांचा भात बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

भिजवलेले काळे चणे
कांदा
टोमॅटो
आलं लसूण पेस्ट
तांदूळ
लाल तिखट
हळद
मीठ
धणे पावडर
जिरं पावडर
गरम मसाला

कृती: काळ्या चण्यांचा भात बनवण्यासाठी सर्वप्रथम, कुकरमध्ये तेल गरम करून घ्या. त्यानंतर त्यात मोहरी, हिंग आणि जिरं टाकून भाजा.

त्यानंतर त्यात कांदा, टोमॅटो आणि चवीनुसार मीठ टाकून शिजवून घ्या. कांदा व्यवस्थित शिजल्यानंतर त्यात आलं लसूण पेस्ट घालून मिक्स करा.

आलं लसूण पेस्ट तेलात भाजून झाल्यानंतर लाल तिखट, गरम मसाला, धणे पावडर, जिरं पावडर घालून व्यवस्थित मिक्स करा.


नंतर त्यात भिजवलेले काळे चणे आणि तांदूळ घालून आवश्यकतेनुसार पाणी घालून कुकरचे झाकण लावून बंद करा.

कुकरच्या ४ किंवा ५ शिट्ट्या झाल्यानंतर गॅस बंद करून काळ्या चण्यांचा भात लोणच्यासोबत सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला काळ्या चण्यांचा भात.

## रविवार होईल आणखीनच मझेदार! सकाळच्या नाश्त्यात झटपट बनवा पौष्टिक पनीर सँडविच, लहान मुलांसह मोठ्यांही आवडेल

रविवार म्हंटल की सुट्टीचा दिवस. सुट्टीच्या दिवशी घरात सगळेच सदस्य असतात. त्यामुळे सकाळच्या नाश्त्यात नेहमीच काय बनवावं? हा प्रश्न बऱ्याचदा सर्वच महिलांना पडतो. नाश्त्यात नेहमीच कांदापोहे, उपमा, शिरा खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. नाश्त्यात बाहेरील तिखट किंवा तेलकट पदार्थांचे सेवन केल्यामुळे शरीरात ॲसिडिटी वाढू लागते. शरीरात वाढलेल्या ॲसिडिटीमुळे उलट्या, मळमळ किंवा इतरही समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सकाळच्या नाश्त्यासाठी झटपट पौष्टिक पनीर सँडविच बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. पनीर खाणे आरोग्यासाठी अतिशय चांगले आहे. यामध्ये असलेले घटक शरीरासाठी फायदेशीर ठरतात. वाढलेले वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी इतर कोणत्याही पदार्थाचे सेवन करण्याऐवजी नाश्त्यात पनीर सँडविचचे सेवन करावे. चला तर जाणून घेऊया पौष्टिक पनीर सँडविच बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: पनीर कांदा टोमॅटो शिमला मिरची टोमॅटो सॉस मीठ ब्रेड गाजर काळीमिरी पावडर चीज बटर कृती: पनीर सँडविच बनवण्यासाठी सर्वप्रथम, मोठ्या वाटीमध्ये बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, शिमला मिरची घेऊन मिक्स करा. नंतर त्यात उकडलेले मक्याचे दाणे टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. सँडविचची चव वाढवण्यासाठी त्यात काळीमिरी पावडर, चवीनुसार मीठ आणि ओरिगॅनो टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. ब्रेडच्या स्लाइसवर टोमॅटो सॉस आणि हिरवी चटणी लावून पसरवून घ्या.



## अंघोळ करताना थंड की गरम पाणी वापरावे? जाणून घ्या शरीरासाठी कोणते पाणी आहे जास्त प्रभावी

अंघोळ करण्यासाठी कोणते पाणी वापरावे?
थंड पाण्याने अंघोळ करण्याचे फायदे?
गरम पाण्याची अंघोळ करण्याचे फायदे?

शरीर स्वच्छ करण्यासाठी नेहमीच अंघोळ केली जाते. अंघोळ केल्यामुळे शरीरासोबतच मन कायमच प्रसन्न राहण्यास मदत होते. दिवसभर करून शरीरात वाढलेला मानसिक तणाव कमी करण्यासाठी अंघोळ केली जाते. शरीरातील थकवा आणि अशक्तपणा कमी करण्यासाठी अंघोळ करावी. काहींना दिवसभरातून दोन वेळा अंघोळ करण्याची सवय असते. सकाळी आणि रात्रीच्या वेळी अनेक लोक अंघोळ करतात. वर्षाच्या बाराही महिने अनेक लोक थंड पाण्याने तर काही गरम पाण्याची अंघोळ करतात. पण कायमच सगळ्यांचा हाच प्रश्न पडतो की अंघोळ करताना कोणत्या पाण्याचा वापर करावा. थंडीच्या दिवसांमध्ये गरम पाण्याची अंघोळ करण्याचा सल्ला दिला जातो. गरम पाणी शरीरासाठी फायदेशीर मानले जाते. अंघोळीसाठी थंड किंवा गरम पाण्याचा वापर केल्यामुळे शरीरावर वेगवेगळे परिणाम दिसून येतात.

अंघोळीच्या पाण्यात अनेक लोक दूध किंवा मीठ टाकतात. यामुळे शरीरासोबतच मनालासुद्धा अनेक फायदे होतात. अनेक लोक ऋतू आणि शरीराच्या प्रकृतीनुसार अंघोळीसाठी पाणी निवडले जाते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला अंघोळ करताना कोणते पाणी जास्त प्रभावी ठरते, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. तुमच्या तब्येतीनुसार पाणी निवडल्यास शरीरासाठी जास्त प्रभावी ठरेल.

नियमित योग्य पद्धतीने अंघोळ केल्यास मानसिक आरोग्य, केसांची निगा आणि रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते. तसेच केस गळणे, केसांच्या अनेक समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी अंघोळ करताना जास्त गरम पाण्याचा वापर करू नये. आरोग्यासंबंधित अनेक समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी शरीरास आवश्यक असलेल्या गोष्टी कराव्यात. डॉक्टरांच्या मते, सकाळी उठल्यानंतर थंड पाण्याने आणि रात्री गरम पाण्याची अंघोळ करणे अतिशय प्रभावी ठरेल. तसेच अंघोळीला जाण्याच्या एक तास आधी पाण्याचे सेवन करावे. यामुळे शरीराचा रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. अंघोळ करताना गरम पाणी डोक्यावर टाकू नये. यामुळे शरीराचे रक्तभिसरण सुधारते.



सकाळी थंड पाण्याची अंघोळ केल्यास शरीराला होणारे फायदे:

सकाळी उठल्यानंतर थंड पाण्याची अंघोळ केल्यास झोप लगेच उडून जाते. तसेच मेंदूचे कार्य सुधारते. थंड पाण्यामुळे त्वचेतील सेन्सर्स मेंदूला क्टिव्ह करण्यास मदत करतात. शरीराचा मूड सुधारतो, अलर्टनेस आणि फोकस वाढण्यास मदत होते.

## स्वातंत्र्यासाठी क्रांतिवीरांनी मोठी किंमत मोजली याचे सर्व नागरिकांनी भान ठेवावे : सौ. सुदामतीताई वाघ

मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परिक्षेत शाळेतून अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरूपात शिदोड गावचे माजी सरपंच तथा बीड शहरातील नामांकित उद्योजक श्री. गणेश (आबा) कदम यांनी सुरू केलेली प्रोत्साहन बक्षीस प्रथम क्रमांक मिळवलेलया कु अनुष्का सचिन धुमाळ हिस रोख दोन हजार रुपये,(२००० ) द्वितीय क्रमांक मिळवलेल्या चिरंजीव प्रथमेश विठ्ठलराव काकडे यास एक हजार पाचशे, (१५०० ) तृतीय क्रमांक मिळवलेल्या चि. शरद दत्तात्रय शेंडगे यास एक हजार रुपये (१०००) तर चौथा क्रमांक मिळवलेल्या चि. सपना संतोष शिंदे हिस उत्तेजनार्थ बक्षीस म्हणून रोख पाचशे रुपयांचे (५००) बक्षीसाचे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच शिदोड येथील ग्रामदैवत श्री महालक्ष्मी देवीचे पुणे येथील भक्त श्री मिंलीद जोशी यांच्या कडून दिले जाणारे बक्षीस श्री दिलीपराव कदम यांच्या हस्ते प्रतिवर्षी प्रमाणे जाहीर केलेले बक्षीस अनुक्रमे एक हजार रूपये १०००/द्वितीय क्रमांकाचे पाचशे रुपये (५००/) तृतीय क्रमांकाचे तीनशे रुपये (३००/ ) रोख बक्षीस आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शाळेमध्ये निबंध स्पर्धेसह इतर स्पर्धांचा आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेली कु. प्रीती कांबळे, द्वितीय क्रमांक मिळेलेली श्रेया कदम आणि तृतीय क्रमांक मिळवलेली कु अक्षरा साळुंखे यासह सहकार्याने भाऊ या विषयांतर्गत रक्षाबंधनाचे औचित्य साधून राखी बनवण्याच्या या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अमृता पाखरे, द्वितीय क्रमांक श्रेया कदम, तृतीय क्रमांक रागिनी डोंगरे आणि चतुर्थ क्रमांक अक्षरा मस्के हिना मिळवला. या सर्व विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या शुभहस्ते शालेय साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.

बीड/प्रतिनिधी देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लाखो क्रांतिविरांना मोठी किंमत मोजावी लागली, कित्येकांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली आहे. एकंदरीतच देशाला मिळालेले स्वातंत्र्य हे लाख मोलाचे आहे. याचे प्रत्येक नागरिकांनी भान ठेऊन वागावे. या स्वातंत्र्याचा गैरफायदा न घेता सर्वांचं स्वातंत्र्य अबाधित ठेवून समाजात सलोखा निर्माण करत देशाचे उज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी शिक्षकांच्या पाठोपाठ पालकांनी आणि समाजातील प्रत्येक नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजे असे मत शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सौ सुदामतीताई वाघ यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहणा नंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव श्री नामदेवराव वाघ, गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री. गणेश कदम, श्री. दिलीप कदम, पांडुरंग शेंडगे, प्रवीण तोडकर, विक्रम कदम, दत्तात्रय शेंडगे, दादाराव काळे, सर्जेराव भडगळे, बालाजी कवठेकर, रामगुडे यांच्यासह दत्तात्रय चव्हाण सर (मुख्याध्यापक), आत्माराम वाव्हळ सर आदी उपस्थित होते.

बीड शहरापासून जवळच असणाऱ्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला हिंदवी स्वराज्याचे निर्माते राजाधिराज श्रीमंत योगी शिवछत्रपती श्री शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महापुरुषाच्या प्रतिमा पूजनांतर संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामातीताई वाघ यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांचे पाहुण्यांचे शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागतानंतर शाळेतील काही निवडक विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाबद्दल आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक तथा प्रसिद्ध उद्योजक श्री गणेश आबा कदम यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यानंतर शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ सुदामाती ताई वाघ यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. या वेळी बोलताना सौ सुदामतीताई वाघ म्हणाल्या की, भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक क्रांतिकारी, स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. लो.टिळक,म.गांधी, सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस या महापुरुषांच्या नेतृत्वाखाली अनेक जण स्वातंत्र्याच्या लढाईत धारातीर्थी पडले, लाखो देशभक्तांनी देशासाठी आपलं बलिदान दिल आहे. त्यांच्या या बलिदाना नंतर १५ ऑगस्ट १२९४७ साली ब्रिटिश राजवटीतून भारत स्वतंत्र झाला. भारतातील सांस्कृतिक तसेच धार्मिक विविधतेमुळे भारत जेव्हा स्वतंत्र झाला. तेव्हा अनेकांनी भारत हा देश एकसंध राहणार नाही असे भाकित वर्तवले होते. परंतु विविधतेत एकता हेच भारताचे वैशिष्ट्य ठरले आणि आज ७९ वर्षाच्या स्वातंत्र्यतोत्तर वाटचालीत भारताच्या एकात्मतेला कुठेही तडे गेले नाहीत.भारताने तंत्रज्ञान, विज्ञान, शेती, शिक्षण असा विविध क्षेत्रात प्रगती केली. या प्रगतीच्या जोरावर आज भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारत ज्या वेगाने प्रगती करत आहे त्या किबंहुना त्याच्या दुप्पट वेगाने भारत विविध समस्यांनी वेढला गेला आहे. तेव्हा प्रश्न पडतो की खरच आपण स्वतंत्र आहोत का? स्वातंत्र्य मिळून ७९ वर्ष झाली. काही भागात अद्याप मूलभूत सुविधा मिळत नाहीत ही अत्यंत खेदाची बाब आहे. वास्तविकरित्या विचार केल्यास ब्रिटिश राजवटीतून आपण कधीच मुक्त झालो. पण महागाई, दहशतवाद, भ्रष्टाचार, स्वैराचार यात मात्र अडकलो आणि यातून दिवसेंदिवस बाहेर पडणं कठीण होत चाललयं. परदेशियांशी लढणं सोपं आहे पण स्वकियांशी लढण खूप कठीण आहे. भारत देशाला महान आणि तडफदार नेते, राजकारण्यांचा इतिहास आहे. परंतु आज या भारत देशात प्रचंड भ्रष्टाचार वाढला आहे की आणखी काही दिवसांनी तो एक शिष्टाचार होतो की काय अशी भीती निर्माण झाली. एकीकडे भारत देश आर्थिक महासत्तेची स्वप्न बघत असताना भारतात लाखो नागरिक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. या लोकांना अन्न,वस्त्र आणि निवारा या जीवनाश्यक गोष्टीची भ्रांत आहे. तर दुसरीकडे देशाचा पोशिंदा शेतकरी आत्महत्या करत आहे. शेतकर्यांच्या आत्महत्या हा भारत देशासाठी मोठा कलंक आहे.एकंदरीत सुजलाम सुफलाम भारत देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी आपणास क्रांतिकांचे योगदान कायम ध्यानात ठेवले पाहिजे.या देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लाखो क्रांतीविरांना मोठी किंमत मोजावी लागली त्यामुळे मिळालेले स्वातंत्र्य हे लाख मोलाचे आहे याचे सर्वांनी भान ठेऊन वागले पाहिजे. लाखो शहीदांच्या बलिदाना नंतर मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा न घेता सर्वांचं स्वातंत्र्य अबाधित ठेवाव. त्याच बरोबर समाजात सलोखा निर्माण करून देशाचे उज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी शिक्षकांच्या पाठोपाठ पालकांनी आणि समाजातील प्रत्येक नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन सौ. सुदामतीताई वाघ यांनी शेवटी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी तर आभार श्री दत्तात्रय चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# आरोग्य विभागाच्या कंत्राटी कर्मचार्यांच्या न्याय हक्कासाठी काँग्रेस शासनाशी भिडणार.. !! काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके

लातूर :- लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात कंत्राटी तत्वावर काम करणारे सुमारे ९५० अधिकारी व कर्मचारी यांनी दि. १९ ऑगस्ट २०२५ पासून आपल्या विविध मागण्यांकरिता संविधानिक मार्गाने बेमुदत आंदोलन पुकारलेले आहे. या आंदोलानाचा आज चौथा दिवस असून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री. अभय साळुंके यांनी जिल्हा परिषदेच्या आवारातील आंदोलनस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन आपल्या पक्षाचा सदर आंदोलनास जाहीर पाठींबा असल्याचे नमूद केले. यावेळी, कर्मचार्यांच्या मागण्या जाणून घेऊन त्या अनुषंगाने जिल्हा काँग्रेस पक्ष न्याय व हक्कासाठी आपल्या सोबत असून, राज्य पातळीवर देखील पक्षाचा या आंदोलनास पाठींब्यासाठी पुढाकार घेऊन राज्य शासनास या आंदोलनाची दखल घेण्यास भाग पाडू तसेच जर या आंदोलकांच्या रास्त मागण्याची दखल शासनाने त्वरित न घेतल्यास, प्रसंगी काँग्रेस पक्ष शासनास संविधानीक मार्गाने भिडण्याची भूमिका घेईल, असे आश्वासन दिले. दरम्यान, एकत्रीकरण समिती मार्फत त्यांना आंदोलकांच्या मागण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हास्तरीय एकत्रीकरण समितीचे हेमंत सोळुंखे, अबरार मोहसीन, गिरीश कुलकर्णी, डॉ. अशुकेत वैरागे, डवरी संगीता, आनंद दिवे, संदिप त्रिकोळीकर, ओमप्रकाश सोनवणे, पांडुरंग मुळे, पूजा पाटील, बालिका बिराजदार व जिल्ह्यातील इतर सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दि.१४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करणे, वेतन वाढ, बोनस, विमा धोरण, बदली धोरण, झचचतध कर्मचार्यांचे छक्च् मध्ये समायोजन आणि प्रलंबित मानधन इत्यादी मागण्यांसाठी राज्यभरात बेमुदत कामबंद आंदोलन सुरु असून त्याचाच भाग म्हणून लातूर जिल्हा परिषदेच्या आवारात दि. १९ ऑगस्ट २०२५ पासून आरोग्य विभागातील कंत्राटी अधिकारी व कर्मचारी आंदोलनात सहभागी झालेले आहेत. आंदोलनाचा आज चौथा दिवस असून जिल्ह्यातील आरोग्य सेवा विस्कळीत होत असल्याने शासनाने तात्काळ या आंदोलनाची दखल घेण्याची आंदोलकांनी मागणी केली आहे.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर :- कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २३ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ६ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# सलग दुसऱ्या दिवशी सिंगल युज प्लास्टिक बंदी बाबत मनपाची कारवाई

## ५५० किलो सिंगल युज प्लास्टिक जप्त





लातूर /प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांच्या उपस्थितीमध्ये आज सिंगल युज प्लास्टिक बंदी बाबत शहरातील गंजगोलाई भागातील दोन गोडावुन मध्ये धडक कारवाई करून एकूण ५५० किलो (अंदाजे ८० हजार रूपये किंमतीचा प्लास्टिक साठा) जप्त करण्यात आला. सदरील कारवाई मध्ये मुख्य स्वच्छता अधिकारी कलिम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवि कांबळे, धोंडिबा सोनवणे, अक्रम शेख यांच्यासह अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. ही मोहीम अशीच सुरू राहणार असून आगामी सणासुदीच्या दिवसांमध्ये नागरिकांनी प्लास्टिक कॅरीबग वापर टाळून कापडी बॅगचा वापर करावा व पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा असे आवाहन उपायुक्त डॉ पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे.

# आशिया कप निवडीनंतर BCCI चा मोठा निर्णय, नवीन निवड समिती सदस्यांसाठी मागवले अर्ज

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) वरिष्ठ पुरुष निवड समितीतील दोन रिक्त जागा आणि महिला निवड समितीतील चार रिक्त जागा भरण्यासाठी अर्ज मागवले आहेत.



या निवड समितीच्या पदांसाठी पात्रता निकषांमध्ये गेल्या काही वर्षांत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. सर्व अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १० सप्टेंबर २०२५ आहे. त्यानंतर बीसीसीआय उमेदवारांच्या नावांवर विचार करेल.

वरिष्ठ पुरुष निवड समितीतील दोन जागा रिक्त -

वरिष्ठ पुरुष निवड समितीतील दोन जागा रिक्त असून, या पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना कसोटी, एकदिवसीय, टी-२० आणि बीसीसीआयद्वारे ठरवण्यात येणाऱ्या अन्य कोणत्याही स्वरूपातील भारतीय पुरुष क्रिकेट संघाच्या (वरिष्ठ) निवडीची जबाबदारी पार पाडावी लागेल. यासाठी बीसीसीआयने पात्रता निकषही निश्चित केले आहेत.

पात्रता निकष: किमान ७ कसोटी सामने; किंवा ३० प्रथम श्रेणी सामने; किंवा १० एकदिवसीय आणि २० प्रथम श्रेणी सामने खेळलेले असावेत.

खेळातून किमान ५ वर्षांपूर्वी निवृत्ती घेतलेली असावी.

बीसीसीआयच्या कोणत्याही क्रिकेट समितीचे एकूण ५ वर्षांपेक्षा जास्त काळ सदस्य नसावे.

नुकतीच झाली आशिया कपसाठी भारतीय संघाची निवड - बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले की, निवड समितीच्या सदस्यांचा करार दरवर्षी नूतनीकरण केला जातो. कोणत्या निवड समिती सदस्यांना बदलायचे याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही, परंतु ही प्रक्रिया लवकरच सुरू होईल. सध्या वरिष्ठ पुरुष निवड समितीचे अध्यक्ष माजी भारतीय वेगवान गोलंदाज अजित अगरकर असून, त्यात एस. एस. दास, सुब्रतो बॅनर्जी, अजय रात्रा आणि एस. शरथ यांचा समावेश आहे. या समितीने नुकतेच आशिया कपसाठी भारतीय संघाची निवड केली होती.

ज्युनियर निवड समितीतही एक जागा रिक्त - याशिवाय, बीसीसीआयने पुरुष ज्युनियर क्रिकेट निवड समितीतील एक रिक्त जागा भरण्यासाठीही अर्ज मागवले आहेत. ही समिती शिबिरे, दौरे आणि स्पर्धांसाठी २२ वर्षांखालील वयोगटातील संघांच्या निवडीची जबाबदारी सांभाळते.

# वंचित बहुजन आघाडीच्या वतीने लातूर शहरांमधील कोंडवाडा व स्लॉटर हाऊस चालू करण्यासाठी मनपाला निवेदन

लातूर :- महानगरपालिका प्रशासनाने स्वतःच्या हद्दीमध्ये स्लॉटर हाऊस बांधणे. २० ते २७ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर केलेली मांस विक्री बंदी मागे घ्यावी.महानगरपालिका प्रशासनाने बंद पडलेला कोंडवाडा चालू करणे. यासाठी निवेदन देण्यात आले. मा. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार या देशांमध्ये सर्वांना स्वतःच्या मर्जीनुसार पौष्टिक आणि गरजेचं अन्न खाण्याचा अधिकार आहे. त्यानुसार कृषी समाजाच्या व्यवसायातील संबंधित असलेला कत्तलखाना हा ज्या त्या नगरपरिषद महानगरपालिकेने स्वतः तयार करणे आवश्यक आहे त्यानुसार आपण आपल्या हद्दी मध्ये स्वतःचा कत्तलखाना ची उभारणी करावी. २० ते २७ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर केलेली मांस विक्री बंदी मागे घ्यावी. आपल्या लातूर शहरांमध्ये औद्योगिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून कोणतीही उपलब्धता नाही त्यातच आपण राजकीय आणि धार्मिक या गुंतागुंतीमध्ये न अडकता आपण प्रशासक म्हणून कार्य करावे आणि आपल्या माध्यमातून जाहीर केलेली मांस विक्री बंदी मागे घ्यावी. वर्षानुवर्ष लातूर शहरांमध्ये डीसीसी बँकेच्या पाठीमागे शहरातील फिरती जनावरांना ठेवण्यासाठी कोंडवाडा उपलब्ध होता पण महानगरपालिका प्रशासनाने जाणून-बुजून बंद केलेला तो कोंडवाडा पूर्वत चालू करावा. जेणेकरून शहरांमध्ये जो काही जातीय ताण-तणाव गोवंश व गोरक्षण नावाखाली होत आहे त्यामधून जनावरे हे आपल्या कोंडवड्यात ठेवता येतील व शासन आणि प्रशासनाच्या निगराणीखाली पुढील कारवाई होत राहील. या निवेदना माध्यमातून आम्ही प्रशासनाला सूचित करतो वरील मागण्याचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून आपल्यास देण्यात येत आहे यावर त्वरित निर्णय द्यावा. नाहीतर पुढील होणाऱ्या आंदोलन व विरोधाला प्रशासन जबाबदार असेल. यावेळी वंचित बहुजन आघाडी लातूर जिल्हा उपाध्यक्ष खलील शेख भाई,शहर अध्यक्ष इंजि.सचिन अर्जुन गायकवाड , शहर महासचिव आकाश इंगळे भैया, महिला शहराध्यक्ष सुजाता अजनीकर ताई, शहर सचिव शरीफ पठाण भाई, कुरेशी समाज प्रतिनिधी ,पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# येवता व कोल्हेवाडी परिसरामध्ये एका रात्रीमध्ये तीन ठिकाणी जबरी चोरी तीन घरफोडीच्या घटनेमध्ये १० लाख रुपयांचा ऐवज लंपास ऊस तोड कामगाराचा संसार उद्धवस्त

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील येवता व कोल्हेवाडी परिसरामध्ये एका रात्रीमध्ये तीन ठिकाणी जबरी चोरी घटना घडली असून या तीन घरफोडीच्या घटनेमध्ये १० लाख रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, आत्माराम बन्सी राठोड वय २८ वर्षे रा. येवता ता.केज हे येवता येथील लमान तंड्यावर त्यांची पत्नी, बहिण, एक मुलगा, दोन मुली आणि आई-वडिलांसह एकत्र राहत आहेत. दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी रात्री १०-०० आत्माराम राठोड हे कुटुंबा सोबत जेवण करून एका खोलीमध्ये व वडील एका खोलीमध्ये झोपले होते. राठोड कुटुंब हे गाढ झोपेमध्ये होते. दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे ४-०० वाजण्याच्या सुमारास त्यांचे वडील बन्सी राठोड यांनी मुलगा आत्माराम राठोड यांना आवाज देऊन झोपेतून उठवले व त्यांना म्हणाले की, घराच्या बाहेर ये चोरी झाली आहे. तेव्हा आत्माराम राठोड झोपेतून उठून दरवाजा उघडून बाहेर येत असताना त्यांच्या खोलीचा दरवाजा उघडा होता आजूबाजूला पाहिले असता आत्माराम राठोड यांच्याही रूम मधील साहित्य अस्तव्यस्त पडलेले होते. त्यावेळी आत्माराम राठोड व त्यांचे वडील बन्सी राठोड यांनी त्यांच्या दोन्ही घराच्या दोन्हीही खोल्यांमधील सामानाची व साहित्याची पाहणी करून काय काय घरातील वस्तू चोरीला गेल्या आहेत त्याची खात्री केली असता. त्यांच्या असे लक्षात आले की, राठोड यांचे कुटुंब हे झोपलेले असताना त्यांच्या पत्र्याच्या शेडच्या घरामध्ये दोन्हीही रूमचे आतून लावलेले दारं कोणीतरी अज्ञात



चोरट्याने काढून त्यांच्या घरातील रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने चोरून घेऊन गेले आहेत. त्यानंतर आत्माराम बन्सी राठोड हे सदर घटनेची माहिती देण्यासाठी पोलीस ठाणे केजी येथे आले असता त्यांच्या घराजवळ घर असलेले महादेव दशरथ निर्मळ रा. येवता लमान तांडा,यांनी केज पोलीस स्टेशनला मोबाईल दूरध्वनी वरून फोन करून कळवले की, माझ्या राहत्या घरी पण चोरी झालेली आहे असे पोलीस स्टेशनला निर्मळ यांनी कळविले त्यानुसार निर्मळ व राठोड या दोघांचेही घरची एकाच रात्री चोरी झाली आहे. आत्माराम राठोड यांच्या घराजवळच राहणारे महादेव निर्मळ यांच्या घराचे दरवाजा तोडून आत प्रवेश करून कोणीतरी अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने हे २१ ऑगस्ट रोजी रात्री १-०० ते पहाटे ४-०० वाजण्याच्या दरम्यान चोरून घेऊन गेले आहेत. चोरीला गेलेल्या वस्तूचे पुढील प्रमाणे वर्णन २ लाख ६० हजार रुपये रोख रक्कम, सोन्याचे दागिने ८ ग्रॅमचे झुंबर, ८ ग्रॅम चे गंठण,४ ग्रॅमचे कानातील टॉप्स, एक ग्रॅमच्या कानातील काड्या, अंगठी १, मनी १ ग्रॅम, बदाम ३ ग्रॅम, अंगठी ५ ग्रॅम, एकूण ३१ ग्रॅम सोन्याचे दागिने द्यायचे अंदाजे किंमत १ लाख ५५ हजार रुपये,१२ हजार ५०० रुपये किमतीचे दागिने, पाटल्या ३ जोड, ३ भाराचे बाजूबंद, ५ भिराची कबरेची साखळी, १० भार कबरेची साखळी, ५ भार अंगठी, २ भाराची अंगठी एकूण २५ भार चांदीचे दागिने, तर राठोड यांच्या शेजारी राहणारे महादेव दशरथ निर्मळ यांचे सोन्याचे दागिने चोरून नेले त्याचे वर्णन १ ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरले त्याची अंदाजे किंमत ५ हजार रुपये ४ लाख ३२ हजार ५०० रुपये किमतीचे वरील वर्णनांचे सोन्या-चांदीचे दागिने व रक्कम ही २१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री १ ते पहाटे ४-०० वाजण्याच्या दरम्यान आत्माराम राठोड व त्यांच्या वडिलांच्या रूमचा व त्यांच्या शेजारी राहणारे महादेव निर्मळ यांच्या घराचा दरवाजा तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आज प्रवेश करून चोरी करून घेऊन गेले आहेत अशा आशयाची केज पोलीस ठाणे येथे आत्माराम बन्सी राठोड यांच्या तक्रारीवरून गु.र.नं.४५५/२०२५ भारतीय न्याय संहिता (बी एन एस)२०२३ कलम ३३१(४),३०५( र) नुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम हे करत आहेत.

# कुठल्याही पक्ष, संघटन, संस्थेचा पदाधिकारी हा बुद्धिमत्तेचा अलौकिक संचय असला पाहिजे. बी. बी. मेश्राम

## फुशाआ स्टडी सर्कलची १२८ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे प्रांताचे प्रधानमंत्री हा प्रांताच्या बुद्धिमत्तेचा अलौकिक संचय असला पाहिजे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील विधानावर १२८ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा १७ ऑगस्ट २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, मुळात हा विषय सभागृहात कार्यरत असलेल्या प्रतिनिधींच्या भत्ते व पगाराविषयी संबंधित होता. करिता वर्तमानातील विविध सभागृहात अस्तित्वात असलेल्या प्रतिनिधींना मिळणारे भत्ते पुरेसे आहेत किंवा नाही? हे तपासले पाहिजे. त्यांना पुरेशा निधी मिळत असल्यास ते भ्रष्टाचार करणार नाहीत. म्हणून बाबासाहेब म्हणाले होते कि, मंत्र्यांचे सामाजिक स्थान व त्यांना लागणारी आर्थिक तरतूद ठरविताना त्यांची कार्यक्षमता, लोकशाही, राज्यकारभाराचे पावित्र्य आणि सचोटी याचा विचार केला पाहिजे.

गल्ली, कॉलनी, वार्ड व शहरातील विविध वसाहतीतील मंडळाच्या कार्यकारणीतील सदस्यांची जबाबदारी तसेच सामाजिक, धार्मिक, राजकीय व इतर क्षेत्रातील केंद्रीय, राज्य व जिल्हा कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक भूमिका तपासली पाहिजे. कुठल्याही पक्ष, संघटन, संस्थेचा पदाधिकारी हा बुद्धिमत्तेचा अलौकिक संचय असला पाहिजे. विविध संघटनात नेते व कार्यकर्ते यांची द्वितीय फळी उपलब्ध व्हावी असे वाटत असेल तर संबंधितांना प्रशिक्षित केले पाहिजे. म्हणून बाबासाहेब तेव्हाच १९५६ च्या काळात म्हणाले होते की ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स चालविले पाहिजे. जेणेकरून त्यांना संबंधित सभागृहात आपली बाजू नीट मांडता येईल. याची सुरुवात त्यांनी आगस्ट १९५६ ला केली होती, जे मार्च १९५७ पर्यंत चालले. परंतु पुढील काळात कुठल्याही पक्ष, संघटन, संस्थेने तसा प्रयत्न न केल्याने समाजाची वाताहात होत आहे. करिता फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल सारख्या कार्यशाळा संपूर्ण देशभर चालविल्या पाहिजेत. ज्याचे परिणाम भविष्यकाळात पाहायला मिळतील. म्हणून आपण आज सदरील विषयावर चर्चा करीत आहोत.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते प्रकाश गायकवाड म्हणाले की, राजकारण दिशाहीन झाले आहे. करिता समाजाला दिशा देणारे नेते व कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. वर्तमान नेतृत्वाने नेतृत्वाची द्वितीय फळी निर्माण होऊ दिली नाही. एका काळातील पँथर आज मांजरात स्थलांतरित झाले आहेत. अशिक्षित पुढे आल्याने, सुशिक्षित मागे पडलेत. गाढवावर वाघासारखे कातडे वापरले तरी ते वाघ होत नसतात.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, आजचे मंत्रिमंडळ कुठल्या विचारावर आधारलेले आहे? ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, लोकसभा, विधानसभा इत्यादी सभागृहात सक्षम प्रतिनिधी पाठवले गेले तरच समाजाचा विकास होईल. केवळ सफेद वस्त्र घातल्याने कुणी पुढारी होत नसतो? आपल्या वर्तमान नेतृत्वाने द्वितीय फळी का निर्माण होऊ दिली नाही? याचा पण विचार केला पाहिजे.

याप्रसंगी इंजिनीयर किशोर पाटील म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कुठलेही विधान समजून घेताना त्याचे संदर्भ तपासले पाहिजेत. मंत्र्यांची कार्यक्षमता, सचोटी आणि पावित्र्य विचारात घेऊन आर्थिक तरतूद केली पाहिजे. असं बाबासाहेब आंबेडकरांनी सभागृहाला पटवून दिले होते. ज्याची प्रचिती गोलमेज परिषदेत आणि पुणे करारत सुद्धा पाहायला मिळते. साडी, माडी आणि गाडीत न राहता शिक्षितांनी आपली भूमिका समाजासाठी पार पाडली पाहिजे. ९६.५ टक्के लढवय्ये क्षत्रिय बहूजनांनी एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला वाहून घेतले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन महादेव डांबरे तर प्रास्ताविक विलास कटारे यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, महादेव डांबरे, विलास कटारे, उद्योजक शशिकांत काळे, उद्योजक मिलिंद बागुल, साधू आनंद, इंजिनिअर किशोर पाटील, प्रकाश गायकवाड इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE